❋ प्रकरण ३ रे ❋

# ‘संध्याकाळच्या कविता’ आणि ‘चंद्रमाधवीचे प्रदेश’ या काव्यसंग्रहांचा परिचय आणि त्यांचे स्वरूप

## ❋ प्रकरण ३ रे ❋

# 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहांचा परिचय आणि त्यांचे स्वरूप

प्रबंधिकेच्या या प्रकरणात आपणास 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या कवी ग्रेस यांच्या दोन काव्यसंग्रहांचा परिचय करून घ्यावयाचा आहे. दोन्ही काव्यसंग्रहातील कवितांचे विषयानुरूप असे स्थूलमानाने वर्गीकरण करावयाचे आहे. प्रत्येक विषयाच्या दोन-दोन कवितांचे प्रातिनिधिक स्वरूपात आकलन करून घ्यावयाचे आहे. आई, घर अशा काही संकल्पनांविषयी ग्रेस यांची काव्यजाणीव अभ्यासावयाची आहे. ग्रेस यांच्या उखाणासदृश कवितानिर्मितीमागील त्यांची मनोभूमिका जाणून घ्यावयाची आहे. तर निसर्गकवितांच्या अभ्यासातून ग्रेस यांच्या कवितेतील निसर्गाचे स्वरूप समजावून घ्यावयाचे आहे. व्यक्तिपर कवितांच्या अभ्यासातून ग्रेस यांच्या जीवनातील महत्वाच्या व्यक्तींचे स्थान व महत्व आकलन करून घेऊन त्या काव्यबध्द व्यक्तींचे ग्रेस यांच्या भावविश्वातील योगदान समजावून घ्यावयाचे आहे. ग्रेस यांच्या कवितेत दुर्बोधता अटळ आहे तरीही काही कविता इतक्या दुर्बोध आहेत की, त्यातील अनुभूतींचा तुटकपणा अर्थाची रस्सीखेच करतो. म्हणून काही दुर्बोध कवितांचे प्रातिनिधिक तत्वावर स्वरूप शोधावयाचे आहे.

## 'संध्याकाळच्या कविता'

कवी ग्रेस यांचा हा पहिलाच कवितासंग्रह, रामदास भटकळ (पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.३५,सी.पं.मालवीय मार्ग, ताडदेव, मुंबई-३४) यांनी १९६७ साली प्रकाशित केला. या कवितासंग्रहाची दुसरी आवृत्ती १९७२ मध्ये निघाली. आणि २००० साली या कवितासंग्रहाचे दुसरे पुनर्मुद्रण झाले.

अस्ताला जाणारा शेंदरी सूर्य आणि संधिप्रकाशाने भरलेला आसमंत असे शीर्षकाला अनुसरून काढलेले चित्र या काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठावर आहे. मलपृष्ठावर ग्रेस यांचा फोटो आहे. त्या फोटोखाली ग्रेस यांचे 'संध्याकाळच्या कविता' बद्दल निवेदन आणि संध्याकाळ आणि त्याचे निर्मितीप्रक्रियेशी संबंध स्पष्ट केले आहेत.

ग्रेस यांनी हा काव्यसंग्रह अभिनेत्री इन्ग्रिड बर्गमनला अर्पण केला आहे. ही अर्पणपत्रिका ग्रेस यांच्याच हस्ताक्षरात आहे. इन्ग्रिड बर्गमनमध्ये ग्रेस यांना त्यांच्या प्रतिभारूपाचा साक्षात्कार प्रथमच झाला त्याबद्दलची कृतज्ञता म्हणून या कविता ग्रेस यांनी बर्गमनला अर्पण केल्या आहेत. इन्ग्रिड बर्गमनसारखी पाश्चिमात्य चित्रपट अभिनेत्री, हजारो मैल अंतरावर राहत असली तरी, चित्रपटातील तिच्या अभिनयाच्या प्रभावामुळे एखाद्या कवीला त्याच्या प्रतिभारूपाची प्रचिती आणून देते हे आश्चर्यच ! ते ग्रेस यांच्या बाबतीत घडले आहे.

अपर्णपत्रिकेच्या मागील बाजूस ग्रेस यांच्याच सुंदर आणि वळणदार हस्ताक्षरात सॉमरसेट मॉम यांचे, "It is not a tragedy that men become old or die but cease to love..." हे अर्थपूर्ण आणि प्रेमाची महती सांगणारे विधान लिहिले आहे. माणसे वृध्द होतात किंवा मरण पावतात ही त्यांची शोकांतिका नसून, ती प्रेम करण्याचे थांबवतात ही शोकांतिका आहे. हे जीवनाचे आणि प्रेमाचे तत्वज्ञान ग्रेस यांना मान्य आहे. 'प्रेम' या भावनेशिवाय जीवन व्यर्थ आहे अशी त्यांची धारणा आहे.

'संध्याकाळच्या कविता' हा ग्रेस यांचा पहिलाच कवितासंग्रह असला तरी त्यामध्ये नवखेपणा वाटत नाही उलट त्यातील नावीन्य, लावण्य आणि उत्स्फूर्तता रसिकांना आनंद देऊन गेली. मराठी कवितेला, रसिकांना, समीक्षकांना संध्याकाळच्या कवितांची जाणीवपूर्वक दखल घ्यावी लागली इतक्या त्या सरस ठरल्या.

पुढील पानावर ग्रेस यांनी रामदास भटकळ आणि लीला गुणवर्धिनी यांच्या विषयीचा ऋणनिर्देश केला आहे. यानंतर ग्रेस यांनी या कविता संग्रहाचे प्रास्ताविक म्हणून दोन कडव्यांची कविताच लिहिली आहे. ती कविताही त्यांच्याच हस्ताक्षरात आहे.

क्षितिज जसें दिसतें
तशीं म्हणावीं गाणीं
देहावरची त्वचा आंधळी
छिलून घ्यावी कोणी.

गाय जशी हंबरते
तसेच व्याकुळ व्हावे,
बुडतां बुडतां सांजप्रवाही;

अलगद् भरूनी यावे.

प्रस्तावनेच्या स्वरूपातील या कवितेतून 'सोलीव दुःखा'चे चिंतन आणि काव्यविषयक जाणीव व्यक्त झाली आहे. अंध त्वचा छिलून घेतल्यानंतर भोगावी लागणारी तीव्र वेदना निरर्थक, वांझ नसून त्यातूनच क्षितिजासारखी विश्वाला वेढणारी, व्यापणारी 'गाणी' जन्मणार आहेत. येऊ घातलेले सुख उपभोगण्यासाठी आधी अटळ दुःख भोगावे लागणारच. नवनिर्मितीचा आनंद उपभोगण्यासाठी प्रसववेदना सोसणे अपरिहार्य असते. भोगवादी अंध त्वचेचे डोळे क्षितिजापलिकडचे पाहू शकत नाहीत. चर्मचक्षूंपेक्षा मनःचक्षूच दुःखी जीवनाचे विरूप आणि आनंदाचे स्वरूप पाहू शकतात. वैयक्तिक दुःखाला क्षितिजाच्या पातळीवर नेऊन कवीने दुःखाला वैश्विकता प्राप्त करून दिली आहे. या कवितेचे दुसरे कडवे नितांत सुंदर आहे. सायंकाळी गोशालेत हंबरणाऱ्या गायीप्रमाणे कवीचे मन व्याकुळ होते. आर्त कातरतेने कवीचे सारे विश्वच काजळणाऱ्या सांजप्रवाहात बुडून जाते. मन अलगद् भरून येणे आणि सांजप्रवाहात बुडून जाणे या परस्परविरोधी क्रियांनी कवीची भावविभोर अवस्था नेमकेपणाने व्यक्त झाली आहे. कवीची भावुक, कातर, करूण मनोवस्थाच संध्याकाळच्या कवितांची जन्मदात्री झाली आहे. वातावरणातील घटनांचा कविमनावर परिणाम होऊन प्रतिक्रियात्मक भावना निर्माण होऊन ग्रेस यांची कविता निर्माण झाली नसेल ना? असे वाटते. कारण निसर्गातील घटिते आणि भावनिर्मिती यांचा क्रम पाहिल्यास तसेच वाटते. विस्तारत जाणारे क्षितिज पाहून कविला गाणी म्हणावीशी वाटतात. गायीच्या हंबरण्याने कविमन व्याकुळ होते. या संदर्भात कवी वा.रा.कांत म्हणतात, ''क्षितिज जसे दिसते तशी म्हणावी गाणी अशी कवीची इच्छा आहे. म्हणजे आपल्या मनातल्या वेदनेच्या संदर्भात, आपल्या व्यथित हृदयाच्या प्रतिक्रियेच्या रूपात, बाह्य सृष्टीत घडणाऱ्या घटनांकडे तो पाहतो. बाहय घटना या आपल्या अंतःकरणात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब आहे, चिन्ह आहे, असे तो मानतो असे दिसते. म्हणून वस्तुपेक्षा तिच्या परिणामांचे चित्रण करणारी ही कविता आहे असे म्हणावेसे वाटते.''[१]

वा.रा.कांत यांच्या मताशी किती सहमत व्हावयाचे हा ही प्रश्नच आहे. कारण ग्रेस मनातील व्यथा-वेदनेचा संदर्भ बाहयसृष्टीतील घटनाशी जोडतात. त्यामुळे वा.रा.कांत यांचे मत ग्राहय मानले तर, ग्रेस यांच्या निसर्ग, ईश्वर, घटना यांचे वर्णन

करणाऱ्या वर्णनात्मक कवितांना कोणता निकष लावायचा? उदा.इन्ग्रिड बर्गमन, वॉर्ड नं.६, आर्थोपेडिक इत्यादी.

'संध्याकाळच्या कविता' सहा शीर्षकाखाली विभागल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आषाढबन | ४) | स्मरणशिल्प |
| २) | चंद्रधून | ५) | ऊर्मिलेच्या कविता |
| ३) | मरणगंध | ६) | बर्फाच्या कविता |

## चंद्रमाधवीचे प्रदेश

'संध्याकाळच्या कविता' या पहिल्यावहिल्या काव्यसंग्रहानंतर तब्बल १० वर्षांनंतर 'चंद्रमाधवीचे प्रदेश' हा ग्रेस यांचा दुसरा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यांच्या 'संध्याकाळच्या कविता' रसिकांच्या हृदयात स्थान निर्माण करून राहिल्या होत्याच. त्यामुळे 'चंद्रमाधवीचे प्रदेश' रसिकांना आवडले. ग्रेस यांच्या काव्यसंग्रहाचे शीर्षकच अत्यंत आकर्षक, तरल, उत्कट आणि उत्कंठावर्धक आहे. कवी या दुसऱ्या काव्यसंग्रहात अधिक मनमोकळा, उत्कट, व्याकुळ झाला असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

'चंद्रमाधवीचे प्रदेश' हा काव्यसंग्रह रामदास भटकळ यांनी १९७७ मध्ये प्रकाशित केला.(पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.३५,सी,पं.मालवीय रोड, मुंबई - ४०० ०३४) १९९१ साली या काव्यसंग्रहाची दुसरी आवृत्ती निघाली. 'संध्याकाळच्या कविता' या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ शीर्षकाचे वर्णन करणारे आहे. संधिप्रकाश आणि अस्ताचलाला जाणारा शेंदरी सूर्य असे संध्याकाळच्या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ आहे. ग्रेस यांची ग्रंथसंपदा पुढील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | चर्चबेल - ललितनिबंध | (१९७४) |
| २) | मितवा - ललित निबंध | (१९८७) |
| ३) | संध्यामग्न पुरूषाची लक्षणे | ललितनिबंध (२०००) |
| ४) | संध्याकाळच्या कविता | कवितासंग्रह (१९६७) |
| ५) | रात्रपुत्र आणि डार्लिंग | कवितासंग्रह (१९७४) |
| ६) | चंद्रमाधवीचे प्रदेश | कवितासंग्रह (१९७७) |
| ७) | सांध्यपर्वातील वैष्णवी | कवितासंग्रह (१९९५) |

यापैकी मुखपृष्ठावर ग्रेस यांचे चित्र नसलेली तीन पुस्तके - १) चर्चबेल २) संध्याकाळच्या कविता ३) राजपुत्र आणि डार्लिंग या तीन पुस्तकाव्यतिरिक्त ग्रेस यांच्या इतर सर्व कवितासंग्रहावर आणि ललितनिबंधसंग्रहावर ग्रेस यांचेच चित्र आहे. 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहावर ग्रेस यांचे चित्र असून त्यांच्या हातात चंद्राची कोर आहे असे दृश्य आहे. या काव्यसंग्रहाच्या अंतर्गतही ग्रेस यांची एकूण आठ चित्रे सुभाष अवचट यांनी रेखाटली आहेत.

काव्यसंग्रहाच्या प्रारंभी, सुभाष अवचट, राम पटवर्धन, सौ.मृदुला जोशी, रामदास भटकळ यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून पुढील पानावर अनुक्रमणिका आणि त्यानंतरच्या पानावर एक इंग्रजी ओळ छापली आहे. ती अशी - .... When you have finished with others, that is my time. आहे. त्यानंतरच्या पानावर ग्रेस यांनी 'आत्मनिवेदन' दिले आहे. त्या आत्मनिवेदनात त्यांनी आपली स्मृतीउदासी (Nostalgia), दुःखजाणीव; निर्मिती प्रक्रिया याबद्दल कविताच मांडली आहे. या निवेदनातच ग्रेस 'मी द्वैती' असेही सांगतात.

'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहाचे चार विभाग आहेत ते पुढीलप्रमाणे -

१) मातृवनातील सावल्या.
२) चंद्रमाधवीच्या प्रदेशात.
३) सूर्यास्ताचे पाणी.
४) धर्मांतराच्या प्रार्थना.

पहिल्या तीन विभागाच्या प्रारंभी तिरप्या छपाईतील कविता आहे. प्रत्येक विभागाच्या प्रारंभी ग्रेस यांचे एक रेखाचित्र आहे, ५३,१२० आणि १९१ या क्रमांकाच्या पृष्ठांवर रविंद्रनाथ टागोर यांच्या इंग्रजी ओळी उद्धृत केल्या आहेत. स्वतः ग्रेस यांना रविंद्रनाथ टागोर यांच्याबद्दल आदरभाव आहे. या काव्यसंग्रहाच्या मलपृष्ठावर ग्रेस यांच्या कवितेचे स्वरूप स्पष्ट करणारा उतारा आहे. त्यांची काव्यजाणीव, आत्मसंवेदना, नितळ अभिव्यक्ती यांचे वर्णन आणि दुर्बोधतेची अटळता त्यामध्ये व्यक्त झाली आहे.

## 'आई' विषयक कविता

ग्रेस यांच्या दोन्ही काव्यसंग्रहातून 'आईविषयक कविता' असा वेगळा कवितांचा गुच्छ करणे अवघड आहे. कारण त्यांची आई त्यांचे संपूर्ण भावविश्व व्यापून राहिली आहे, शिवाय ती केवळ 'आई' नाही तर 'स्त्री' या संकल्पनेची आणि 'स्त्री' तून निर्माण होणाऱ्या सर्व नात्यांचीही प्रतिनिधी आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक कवितेत 'आई' चित्रित झाली आहे. 'माझ्या सर्व प्रेमकवितांच्या निर्मितीशी आईने दिलेले प्रतिभाबळ आहे' असे ग्रेस सांगतात. तरीही अभ्यासाच्या दृष्टीने म्हणून, त्यांच्या 'आईविषयक कवितांचा' एक गट केला आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कलश | संध्याकाळच्या कविता | | पृष्ठ | ३४ |
| दुःख घराला आले | " | " | " | ३५ |
| गाणे | " | " | " | ४५ |
| आठवण | " | " | " | ५४ |
| अंगाईपण | " | " | " | ५७ |
| वाट | " | " | " | ६२ |
| रंगास्त | " | " | " | ७० |
| सांज | " | " | " | ७१ |
| पळस | चंद्रमाधवीचे प्रदेश | | " | ७ |
| कवचकुंडले | " | " | " | १० |
| राखण | " | " | " | ११ |
| नर्तकी | " | " | " | २४ |
| आईचे गाणे | " | " | " | ३६ |
| आई : १ | " | " | " | ३७ |
| आई : २ | " | " | " | ३८ |
| आई : ३ | " | " | " | ३९ |
| घर | " | " | " | ४८ |
| गावातल्या आठवणी | " | " | " | ४९ |
| निष्पर्ण तरूंची राई | " | " | " | ११४ |
| संत | " | " | " | १६८ |
| देवचाफा | " | " | " | १८३ |

'आई' या संकल्पनेकडे, नात्याकडे ग्रेस हे अत्यंत वेगळया दृष्टीकोणातून पाहताना दिसतात. त्यांचा हा दृष्टीकोण अतिविशाल, समंजस, हळवा आहे. 'आई' त्यांचे

भावविश्व व्यापून राहिली आहे. 'ग्रेस यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी' या विभागात 'ग्रेस यांनी रेखाटलेल्या आईचे स्वरूप विशद केले आहेच.

आईविषयक ग्रेस यांची वक्तव्ये थोडी धक्कादायक वाटतात. पण ती ग्रेस यांना नाही तर वाचकांना धक्कादायक वाटतात. याचे कारण ज्या परंपरागत संस्कारांच्या विचारधारेतून वाचक आईकडे पाहतात त्यापेक्षा अत्यंत वेगळया, अपरंपरागत दृष्टीकोणातून ग्रेस आईकडे पाहतात.

त्र्यं.वि.सरदेशमुख यांना लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, ''आईसंबंधी लिहिले होते त्यात - मी पळत नसतानाही माझा सतत पाठलाग करणारी ही एवढीच व्यक्ती माझ्या चिमूटभर आयुष्यात. एवढा चरचरीत द्वेष कुणी केला नाही माझा. मृत्यूच्यावेळी मी तिच्या डोक्याशी जाऊन उभा राहिलो. मला वाटले जाता जाता ती माझ्या बापाचे नाव सांगेल. अत्यंत छद्मी हसून तिने श्वास सोडला. आणि तेंव्हापासून या विराट जगात माझ्या अनुवंशाचे हरवलेले लहानसे मूळ मी शोधतोय.''[२] ग्रेस यांच्या या वक्तव्यावरून सर्वसामान्य पातळीवरून विचार करणाऱ्या व्यक्तीला कदाचित काही वेगळाच अर्थबोध होईल पण मला असे वाटते की, ग्रेस याबाबतीत फार वेगळा विचार करतात. 'आई' पणाचे, मातृत्वाचे महान शाश्वत मूल्य ते प्रस्थापित करतात. 'मातृत्व' हेच सत्य आणि शाश्वत असते आणि पितृत्व हे कल्पित असते. अशा दृष्टीकोणातून ते मातृत्व संकल्पनेचा विचार करतात. बीज-क्षेत्र न्यायाने 'क्षेत्र' असलेले मातृत्व वास्तव, निश्चित, शाश्वत पण 'बीज' मात्र अनुवंशाचे मूळ निश्चित करण्यासाठी ग्रेस यांना पाहिजे आहे. म्हणून त्यांना आईचे अस्तित्व क्षणाक्षणाला जाणवते तरीही त्यांना या विश्वात अनाथ अनुवंशहीन वाटते. त्यांचे 'अनुवंशहीन' वाटणे त्यांच्या कवितेचा धर्म बनला आहे. या अर्थानेही ते स्वतःच्या कवितेला आणि वाङ्मयनिर्मितीला 'अनुवंशहीन' म्हणत असावेत. आईने त्यांचा चरचरीत द्वेष केला तरी ते मात्र आईचा तिरस्कार करीत नाहीत. त्यांना आईविषयी आस, नितांत प्रेम, आदर आहे. त्यांच्या आईविषयक कवितातून ते प्रकर्षाने जाणवते.

### दुःख घराला आले

या कवितेतून आईविना जाणवणारे एकलेपण कवी व्यक्त करतो.

रात्रीच्या घनभारी अंधारात 'चंद्रातुन चंद्र बुडाले' येथे एक आकाशीचा चंद्र आणि दुसरा आईची आस असलेले बालक म्हणजे चंद्र. रात्रीचा आकाशीचा चंद्र घनभारी

अंधारात बुडला आणि आईच्या नसलेपणाने बालकरूपी चंद्र दुःखाच्या अंधारात बुडला. 'आईच्या स्मृतींची दुःखद जाणीव' कवीने उत्सवासारखी स्मरणीय ठेवलीय आहे. हे दुःख घराला आले आहे.

दारात दुःखी अंतःकरणाने कवी आईच्या वाटेवर डोळे लावून बसला आहे. ज्याप्रमाणे क्षितीजाने धरणीला उचलून धरावे तद्‌वतच कवीचे डोळे आईच्या येण्याची प्रतीक्षा करीत आहेत. नदीचे शांत किनारे जसे कुठेच परस्परांना मिळत नाहीत. तद्‌वतच कवीची प्रतिक्षा आणि आईचे जवळ नसलेपण हे दोन किनारे कधीच मिळत नाहीत. या दुःखाने कवीचे हृदय अश्रु ढाळत आहे. त्याला पोरकेपण एकटेपण जाणवते आहे.

नाहीच कुणी अपुलें रे
प्राणांवर नभ धरणारे
दिक्काल धुक्याच्या वेळी
हृदयाला स्पंदविणारे.....

सर्व कालावस्था, सर्व दिशा दुःखाच्या धुक्याने भरलेल्या असताना कविच्या हृदयाला मायेने स्पंदविणारे, प्राणांवर आभाळमाया धरणारे कुणीच नाही.

**वाट .**

कातर आणि आतुर मनाने आईची अंतहीन प्रतिक्षा करणारा कवी 'वाट' या कवितेत प्रारंभी दिसतो. वियोगाचे दुःख उरामध्ये सोसत हे 'वाट पाहणे' सुरू आहे.

संध्याकाळच्या कातरवेळी, उदाच्या धूम्रवलयांकित संधिप्रकाशात मनाची सर्व भावकंपने बाळाच्या इवल्याशा ओंजळीत जमा होताहेत. आयुष्य पाठीशी बांधून सूक्ष्म आत्ममग्न लकेरीत तरंगताना काळोखातून दूरच्या झऱ्याची खळखळ ऐकू येत आहे आणि प्रतिक्षा करणारा कवी अंधारल्यावेळी झाडांकडे, डोंगरांकडे पाहतो आहे. आई कुठेच नाही पण अखेरीस स्वतःच्या अस्तित्वाची खूण आणि प्रतिक्षा करणाऱ्या नजरेचे प्रतीक म्हणून अज्ञाताच्या पारावरती (आई कुठे आहे हे माहित नाही हाच अज्ञात पार आहे) एक पणती लावून ठेवतो.

आईचे नसलेपण कवीला अतीव, अतितरल दुःख देते आहे. उध्वस्त करणारे पोरक्या मुलाचे दुःख कवितेतून पाझरते. अखेरीस ही प्रतीक्षा दीर्घ, अखंड

वाहणाऱ्या नदीसारखी प्रवाही होते आणि वाट पाहणारा शहाणा मुलगा आपले शहाणे डोळे त्या प्रतीक्षा नदीच्या प्रवाहात हलकेच सोडून देतो.

ग्रेस यांची ही कविता काळजाला स्पर्श करणारी आहे. आईची 'वाट' पाहताना ग्रेस नेहमी बालक, बाळ, मुलगा होतात. त्यांचे हे बालवय आणि बालपण त्यांच्या काव्यनिर्मितीवेळच्या वयाशी अथवा सध्याच्या वयाशी कसलेही नाते सांगत नाही. आई आणि लहान मुलगा हेच त्यांचे आईशी बांधलेले वय आहे. आईची प्रतीक्षा करणारे ग्रेस यांचे बालपण त्यांच्या मनात आणि प्रतिभाविश्वात 'सशिल्प' होऊन राहिले आहे त्यामुळे ते बालपण 'स्थित' झाले आहे.

ही कविता एका करूण मनोवस्थेत आपणास घेऊ न जाते. 'नदीच्या प्रवाहावर तरंगणारी पणती' ही प्रतिमा आणि वाट पाहणाऱ्या शहाण्या मुलाचे डोळे ही कल्पना अत्यंत हळुवार, करूण पण अस्वस्थ करणारी, तरीही चित्ताकर्षक आहे. 'शहाणा मुलगा' या शब्दामागे कवीची आईकडे पाहण्याची 'समंजस दृष्टी' आहे. आई 'अज्ञातात' गेली म्हणजे कुठे गेली? मृत्यूच्या अज्ञात प्रदेशात गेली की ती जेथे गेली आहे ते ठिकाण, जाण्याचा हेतू कवीला अज्ञात आहे? जे आहे ते 'वास्तव' या शहाण्या मुलाने स्वीकारले आहे. दुःखभावनेच्या गाठी घट्ट करून दुःखमग्न राहणे हे तर ग्रेस यांचे वैशिष्ट्य आहे.

चंद्रमाधवीचे प्रदेश या कवितासंग्रहातील आईविषयक कवितापैकी आई : १,२,३ या तीन कविता ग्रेस यांचे आईविषयक विचार, भावना, दृष्टीकोण स्पष्ट करतात.

### आई : १

आई गेली तेव्हाचे वर्णन कवी आई :१ या कवितेत करतो आहे. आई गेली तेव्हाची वेळ, घटना कवीला आठवत आहेत. पाऊस रिमझिमत निनादत होता आणि मेघात अडकलेली आपली किरणे सोडवून घेत सूर्यही मावळत होता. म्हणजे संध्याकाळ होत होती.

दुसऱ्या कडव्यात कवीने वेगळा विषय मांडला आहे. ही संध्याकाळ कवीच्या दारात येवून थबकली होती. आई ही त्यांच्या निर्मिती विश्वाची प्रमुख प्रेरणा आहे. त्याच्या प्रतिमासृष्टीची निर्माती आहे. त्यांच्या सर्जनशीलतेचा स्रोत आईपासून उगम पावतो.

म्हणून त्याच शब्दातून नवे नवे अर्थ उगवतात. शब्दांचा मूळ अर्थ काव्यनिर्मितीच्यावेळी ढळून जातो आणि नवे अर्थ शब्दातून कवीमनात प्रकटतात.

तिसऱ्या कडव्यात कवी आईच्या विरहाचे वर्णन करतो आहे. आई गेल्यानंतर कवी पावसाळी मेघासारखा अश्रुपात करतो आहे. आणि वारासुध्दा पाचोळा उडवीत सावधपणे वाहतो आहे.

आई घरात नाही. अंगणात उभा असलेला मुलगा आई गेल्याने एकाकी झाला आहे. त्याचे बालपण जपणारी आई नाही म्हणून तो पोरका होऊन त्याचे बालपण संपले आहे. हे एकटेपण कवीने एकटया धुरकट कंदीलाच्या प्रतिकयोजनेतून मांडले आहे.

शेवटच्या कडव्यात कवी एकदम सांधा बदलतो आणि म्हणतो, 'हे रक्त वाढतानाही (म्हणजे कवीचे वय वाढतानाही असे कवीला म्हणावयाचे आहे का?..... बोध होत नाही.) मला आता आईच्या दुःखाचा गहिंवर येत नाही.

कडव्याच्या शेवटच्या दोन ओळीत कवी आणखी एक वळण घेतो. द्रौपदी वस्त्रहरणाच्या प्रसंगाचा पौराणिक संदर्भ देऊन ग्रेस विषयांतर करतात असे वाटत असतानाच आपल्या असे लक्षात येते की, कवीने विषयांतर केले नाहीच उलट मूळ दुःखाचे आणि 'आई' विषयाचे सूत्र मुळीच सोडले नाही.

द्रौपदीला वस्त्रे पुरविणाराच स्वतः नागडा आहे. येथे स्त्री-पुरूष यांच्यातील सनातन नाते कवीने स्पष्ट केले आहे. येथे द्रौपदी ही मातृत्वाचे प्रतीक आहे. कृष्ण ईश्वरी अवतार असला तरी इथे तो 'पुरूष' जातीचे प्रतीक आहे. जेव्हा कवी म्हणतो की,

'वस्त्रात द्रौपदीच्याही, तो कृष्ण नागडा होता' येथे 'द्रौपदीच्याही' शब्दामुळे, विशेषतः आग्रहीपणामुळे या दोन ओळीमधून मातृत्वाच्या संकल्पनेला आणि स्त्री-पुरूषातील सनानत नात्याला उठाव आला आहे. याबरोबरच 'स्त्री' ही सृजनाचे प्रतीक असल्याने पुरूष तिच्यासमोर नागडाच आहे. तेव्हा त्याने तिला पुरविलेल्या वस्त्रांना काय अर्थ राहतो? असाही गर्भित प्रश्न इथे उपस्थित होऊ शकतो. म्हणूनच द्रौपदीला वस्त्रे पुरविणारा कृष्ण 'नागडाच' आहे. तसेच येथे 'दुःख' या संकल्पनेचाही विचार होऊ शकतो.

'नागडा' कृष्ण हे सत्याचे रूपही आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात 'आईचा विरह' हे दुःख हे 'अटळ नग्न सत्य' आहे, असे कवीला वाटते.

'सरण' हा शब्द मृत्यूचा संदर्भ घेऊन येतो. म्हणजे कवीच्या मनात मृत्यूची जाणीव सतत आहे. मृत्यूच्या विचाराबरोबरच दुःखजाणीवही आहे. हे दुःख आईच्या विरहाचे आहे. आईच्या मृत्यूचे आहे. बुबुळाच्या अंतःपुरात ईश्वरी दुःखाचा गंधवाही अभिषेक होतो आहे. कवीने आपल्या दुःखाचे उदात्तीकरण करून त्याला 'ईश्वरी दुःख' असे संबोधले आहे. कवी इथे एकदम वेगळया प्रतिमा योजतो आणि त्या अभिषेकाला 'गॉगीनच्या' आंधळया चित्रांची उपमा देतो. इथे कवितेचा पूर्वार्ध संपतो.

कवितेच्या उत्तरार्धात आईच्या अस्तित्वासंबंधी दोन स्तर येतात. पहिला 'स्तर' म्हणजे आई ही कवीची निर्मितीप्रेरणा, निर्मितीशक्तीचे केंद्र असल्यामुळे (आपल्या निर्मितीला कवी जांभळया पंखांच्या पक्ष्यांची उपमा देतो) आपल्या निद्रिस्त पक्ष्यांचे जांभळे पंख आईने आपल्या मायावी हाताने उजळावेत असे कवीला वाटते.

दुसऱ्या स्तरात कवीचा आईच्या अस्तित्वाचा आग्रह, अट्टाहास दिसून येतो. आईला कवीने वात्सल्यपूर्ण दुग्धपान करणाऱ्या स्तनांकित चंद्राच्या आकाशाची उपमा दिली आहे. हे चंद्राचे शीतलमय आकाश कवीचे आईच्या विस्मृतीचे स्वप्नांध वळण उजळवून टाकेल. या आकाशात अनेक चंद्र आहेत.

या कवितेत प्रतिमांचा प्रतिन्यास, दुःखजाणीव, दुःखाला दिलेले ईश्वरी रूप आणि वैश्विक पातळीवर अपेक्षित असणारा आईच्या अस्तित्वाचा कवीचा अट्टाहास व्यक्त झाला आहे. हे सगळेच व्याकुळ पण मोहक, उदात्त, भव्य दिव्य अलौकिक वाटते. ग्रेस यांच्या काही सुंदर कविता पैकी ही एक कविता ठरावी.

## आई : ३

ग्रेस यांचीही 'आई विषयक' आगळी वेगळी, लोकविलक्षण कविता ठरावी अशीच आहे.

स्त्रीचे मातृत्व हा तिच्या आयुष्यातील स्त्रीत्वाच्या परिपूर्णतेचा क्षण असतो. परमेश्वराच्या दरबारातही आईचे श्रेष्ठत्व विश्वाच्या तुलनेत सरस ठरते असे म्हणतात. 'आई' या संकल्पनेला साने गुरूजींनी 'विश्वमाता' केले. 'श्यामची आई' जगातील सगळया

श्यामएवढया मुलांची आई झाली. अशा आईबद्दल, जुन्या काळातील एक वेगळेच भावगीत मी ऐकले होते.

बाळा होऊ कशी उतराई
तुझ्यामुळे मी झाले आई.

अशा त्या भावगीताच्या ओळी ऐकून आईच्या वात्सल्यभावाला असलेली त्यागाची आणि कृतज्ञतेची मोहक, सोनेरी किनार मनात भरते. 'आई थोर तुझे उपकार' असे शब्द आणि आईची महती सांगणारे वाङ्मय वाचून आईची प्रेममूर्ती, वात्सल्यमय, कारूण्यमयी मूर्ती प्रत्येकाच्या मनात निर्माण होते या पार्श्वभूमीवर वरील गीताच्या ओळी आईच्या मनाचा एक वेगळाच कोपरा उजळ करताना दिसतात. त्यात आई आपल्या बाळाला आईपणाचे सगळे श्रेय देते. तुझ्यामुळेच मला आईपण आले असे कृतज्ञतेने ती म्हणताना दिसते. या भावनेच्या नेमकी उलटी स्थिती आई : ३ या कवितेत आली आहे.

ग्रेस यांची 'आई : ३' ही कविता वाचल्यानंतर ग्रेस यांच्या भावविश्वातील आईच्या चित्रशाळेतून वेगळेच चित्र नजर खिळवून ठेवते. एक अपार मायेची आस आणि आई विषयीचा अनाकलनीय संताप या कवितेत दिसून येतो. आईने नऊ महिने उदरात वाढविले, प्रसववेदना सोसल्या आणि हे जग दाखविले. याबद्दल प्रत्येक मानव आईचे ऋण मानतो. ईश्वराला प्रत्येक घरात देहरूपाने राहता येणे अशक्य आहे म्हणून तो आईच्या रूपात घरोघरी राहतो इतके आईचे थोरपण, देवपण, त्याग, सोशीकता आजपर्यंत लोकमान्य आहे. पण आईच्या गर्भातून बालकाने जन्म घेताना ते गर्भातच आडवे झाले तर आई-बाळ दोघेही मरतात. सगळेच संपते. (आधुनिक वैद्यकशास्त्राचा आणि शल्यचिकित्सेचा विचार इथे अस्थायी, अनुचित, विसंगत आहे.) म्हणजे बाळाने गर्भाशयात आडवे न होता 'स्त्री'ला सुखरूपपणे 'आई' होऊ देणे हे बाळाचे आईवर एकप्रकारचे उपकारच आहेत. म्हणून ग्रेस म्हणतात,

आडवाच झोपलो असतो
मीही गर्भाशयात तर
येऊ दिले असते का
तुझ्या वाटयाला माऊलीचे भाग्यपण?

आईची प्रसुतीच्यावेळी अडवणूक न करता बाळाने गर्भाशय सोडणे ही एक शरीरशास्त्रीय नैसर्गिक घटना आहे पण कवीने इथे गर्भाशयातील अर्भकालाही (हे अर्भक स्वतः कवी ग्रेस आहेत) विचारशक्ती दिली आहे. म्हणून हे बालक गर्भाशयात आडवे न होता स्त्रीला जीवनदान देऊन तिला माऊलीचे भाग्यपण देते.

मी तुझ्या गर्भाशयात आडवाच झोपलो असतो तर तुझ्या वाट्याला माऊलीचे भाग्यपण आले असते का?... असा रोखठोक सवाल ग्रेस इथे आईला करताना दिसतात. या प्रश्नात आईविषयी वाटणारी रागाची भावना आहे पण त्या रागामागे प्रेम भावनाही आहे.

कवितेच्या मध्यावर कवी आपला हक्क बजावताना आत्मसन्मानही जपतो. आई मृत्यू पावली. कवी या जगात पाहुणा आहे. आई थडग्यात गेली तिथेही आईने आपल्या मुलासाठी पथारी टाकून त्याच्यासाठी जागा ठेवावी. कारण तो त्याचा हक्कच आहे. आईच्या मृत्यूनंतरही कवीला तिचा विरह मान्य नाही. त्याला त्याच्या मृत्यूनंतरही तिच्या थडग्यातसुध्दा तिच्या शेजारीच, तिच्या कुशीतच जागा हवी आहे. इतकेच काय पण त्याचा त्या जागेवर हक्कच आहे असे कवी अभिमानाने सांगतो आहे. प्रत्येक बालकाचा आपल्या आईच्या वात्सल्यावर, तिच्या प्रेमळ सहवासावर जन्मसिध्द हक्क आहे हेच तत्त्व कवी ग्रेस इथे स्वाभिमानाने प्रस्थापित करतात.

कवितेच्या उत्तरार्धात ग्रेस उद्वेगाने, वैतागाने आईला प्रतिजाप करताना म्हणतात,

तेव्हाच शिवून दिली असतीस
भगव्या क्षितिजाची झोळी
तर काय झाले असते ?

'जन्मालाच घातले नसतेस तर मला तुझ्या वियोगाच्या वेदना तरी सोसाव्या लागल्या नसत्या' असे ग्रेस येथे सूचित करताना दिसतात.

## 'घर' विषयक कविता

घर ही संकल्पना ग्रेस यांच्या जिव्हाळ्याची आहे. 'घर' म्हणजे एक मायेची, प्रेमाची उबदार जागा असे त्यांना वाटते. त्यांच्या कवितेतून घराची वेगवेगळी चित्रे रेखाटलेली दिसतात. या घरात प्रामुख्याने आईची मूर्ती अधिक वास्तव्य करताना दिसते. या घरविषयक कवितांचा एक गट 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या दोन काव्यसंग्रहातून घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| सोन्याच्या मोहरा | संध्याकाळच्या कविता | पृष्ठ १२ |
| घर | ‘‘ ‘‘ | ‘‘ ६० |
| घर | चंद्रमाधवीचे प्रदेश | ‘‘ १९ |
| फुंकर | ‘‘ ‘‘ | ‘‘ ३५ |
| घर | ‘‘ ‘‘ | ‘‘ ४८ |

घराची निर्मिती, घरातील मायेचे वातावरण, बालपणीचे भातुकलीमधील घरकुलाचे स्वप्न या विषयी ग्रेस खूप हळवेपणाने कविता करतात.

### सोन्याच्या मोहरा.

ही त्यांची स्वप्नरंजनात्मक कविता, स्त्री मुखातून आपला अनुभव व्यक्त करते. ही प्रेमविषयक कविता घराचे महत्व सांगते.

'उध्वस्त झालेली स्वप्ने' म्हणजे उकरून गेलेले घर आहे. ती स्वप्ने पुन्हा सजविण्यासाठी चांदणे आणि पाचूचा गिलावा करून ते घर बांधायचे आहे. या घराला छप्पर नाही म्हणून लिंबोणीची गार सावली करायची आहे आणि वळचणीला 'चंद्राची झाल्लर' लावायची आहे.

ही कविता सौंदर्यवादाची आठवण करून देते. चंद्राची झालर लावणे, पाचूचा गिलावा करणे, ओंजळींनी चांदणे भरणे अशा अद्‌भूतरम्य कल्पना या कवितेत आहेत.

आपल्या प्रेमाची आठवण म्हणून प्रियकराची व स्वतःची सावली म्हणजेच अंगणात खेळणारे आपले मूल ही स्वप्नपूर्ती होय. इथे या कवितेतील स्त्री भातुकलीच्या

खेळाच्या स्मृतीत हरवली असली, तरीही सुखी वैवाहिक जीवनाचे स्वप्नही मनात जपत आहे. अंगणात तुझ्या-माझ्या सावलीने म्हणजे चिमुकल्या पाहुण्याने खेळावे असे म्हणून ती आपल्या मातृत्वाच्या इच्छेचे आणि वात्सल्य भावाचे दर्शन घडविते. स्त्रीच्या हळव्या, भावुक, स्वप्नाळू वृत्तीचे इथे मोहक चित्रण येते. पण या स्वप्नपूर्तीसाठी तिला 'सोन्याच्या मोहरा' आणावयाच्या आहेत. बालपणीची भातुकलीत रमणारी परकरी पोर आता प्रियतमा झाली आहे. बालपणीच्या प्रेमालाच ती 'सोन्याच्या मोहरा' म्हणते आहे. आपण आपल्या बालवयात माघारा परत जाऊ आणि सोन्याच्या मोहरा पुरून ठेवल्या आहेत त्या घेऊन येऊ, असे ती आपल्या प्रियकराला सुचविते आहे.

आशावाद, नवनिर्मितीची उमेद,प्रेमभावनेची अतुरता उत्कटता अशा अनेक गुणांनी ही कविता वाचकांच्या कोमल हळुवार भावनांना हलकेच जाग आणते. उज्ज्वल भविष्याचा आशावादी दृष्टीकोन दर्शविणारी ग्रेस यांची ही एकमेव कविता असावी. घर, अंगण, वळचण, छप्पर हे सर्वच शब्द घराचे चित्र रेखाटतात.

## 'घर'

'घर' ही प्रेमाची सावली देणारी जागा असली तरीही खूपदा आपण लहान मुलांना गंमतीने किंवा कृतक् कोपाने 'तुझे घर उन्हात बांधेन' अशी शिक्षा सुनावतो. या कल्पनेला वेगळाच रंग देत 'घर' ही कविता येते.

मुक्या मनात घेतलेल्या ध्यासाप्रमाणे ओल्या वाळूवर तुझे घरकुल आहे. चांदण्याच्या देशातील भातुकलीच्या खेळातली मातीची बाहुली तुझ्या पदरात आहे. अशी भातुकली खेळणारी छोटीशी मुलगी गमतीचा खेळ खेळते. पण या खेळात तिचा बालमित्र जरासा चुकतो आणि ती त्याच्यावर रोष धरते आणि त्या रागापोटी तिने त्याचे 'घर' 'उन्हात बांधले' हे ऐकून तो बालमित्र उरात तडफडतो आहे.

या कवितेत बालपणीच्या निखळ प्रेमाचे भातुकलीचे लोभस चित्रण आले आहे. ओल्या वाळूत लहान मुले 'कोटर', 'घरटे' बांधतात. घरकुलाची स्वप्ने रंगवितात आणि या खेळात नवरा-नवरी, सुखी संसार आणि छोटीशी मातीची बाहुली म्हणजे 'बाळ' अशा हळव्या स्वप्नांच्या विश्वात रममाण होतात. पण बालपणी रूसलेली सखी राग-रूसवा सोडत नाही. ती आपल्या बालसख्याला शिक्षा करते. आणि त्याचे घर उन्हात बांधते.

म्हणजे त्याच्यापासून दूर जाते. विरहाच्या झळात तो बालमित्र उरात तडफडतो आहे. हे दुःख या कवितेत शेवटी चटका लावून जाते.

यांप्रमाणेच कवी घरविषयक कवितांमधून घराचे वर्णन वेगवेगळया शब्दात करतो. त्याने पाहिलेले, अपेक्षिलेले, प्रत्यक्षात असलेले, स्वप्नात पाहिलेले घर अशी घराची विविध भावुक, कातर, करूण चित्रे कवी रेखाटतो.

उकरून गेलेले घर, कोसळलेले घर, चर्चमधील सायंघंटेच्या अंतरावर उभे असलेले घर, ओल्या वाळूवरील घरकुल, थकलेल्या संन्याशासारखे घर, कवी हरखुन पहात असलेले घर अशी घराची अनेकविध वर्णने ग्रेस यांच्या कवितातून येतात.

14073
A

## 'उखाणा सदृश' कविता

उखाणा म्हणजे शाब्दिक कोडी. उखाण्यात अनुप्रासात्मक लय, शाब्दिक गंमत असते. बौध्दिक कसरतीचा, मनोरंजनाचा तो एक छानसा, मिष्कि ल खेळच असतो. उखाण्यातून प्रश्न विचारलेला असतो आणि त्याचे उत्तर त्यातील शब्दांचे सगळे अपेक्षित अर्थ घेऊन येणारे असावे लागते. उखाण्यातच प्रश्नाचे उत्तर दडलेले असते. उदा.

पाऊस नाही पाणी नाही
रान कसे पिकले?
पान कात चुना नाही
तोंड कसे रंगले ?

उत्तर : पोपट

काकीला दोन कान
काकाला काही नाही
काकाचे शहाणपण
काकीला येत नाही

उत्तर : काकी = कडई, काका = झारा

पूर्वी स्त्रिया मनोरंजनासाठी उखाणे खेळत. कवी ग्रेस यांना 'उखाणा' हा प्रकार प्रिय असावा. त्यांनी उखाणे वजा कविता लिहिल्या आहेत त्याबद्दल त्यांना वेगळ्या दृष्टीने अभिमान आहे. उखाणा हा स्त्रियांचा प्रांत समजला जातो. गप्पा मारताना, मनोरंजनासाठी उखाणे घालताना खूपदा त्यात उत्स्फूर्तताही असते. ग्रेस आपल्या उखाणासदृश्य कवितांना 'फेमिनाईन पोएट्री' म्हणतात. या कविता म्हणजे त्यांनी त्यांच्यातील स्त्रीचा घेतलेला शोध आहे. उखाणासदृश्य कविता पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| उखाणा | संध्याकाळच्या कविता | पृष्ठ ११ |
| आकाश | संध्याकाळच्या कविता | पृष्ठ १६ |
| डोळे | संध्याकाळच्या कविता | पृष्ठ २७ |

| | | |
|---|---|---|
| उखाणे | चंद्रमाधवीचे प्रदेश | पृष्ठ २९ |
| जाऊबाई | चंद्रमाधवीचे प्रदेश | पृष्ठ ३० |
| उखाणे | चंद्रमाधवीचे प्रदेश | पृष्ठ ७९ |
| उखाणा | चंद्रमाधवीचे प्रदेश | पृष्ठ ९३ |
| युवराजाची कविता | चंद्रमाधवीचे प्रदेश | पृष्ठ १४८ |

**उखाणे.**

ही कविता आपल्याला दहा उखाणे घालते पण आपण एकाही उखाण्याचे उत्तर देऊ शकत नाही किंवा दिलेले उत्तर अचूक असेलच अशी शाश्वतीही आपणास वाटत नाही.

झाड मधे आले
होई वाट नागमोडी
उडे पोपटाने रान
पिंजऱ्याला कडी

वाटेत झाड मधे येताच वाट नागमोडी होते हे पटण्यासारखे आहे. पण पिंजऱ्याला कडी आहे आणि पोपट उडून जात नाही. पण पोपटाचे रान उडून जाते. इथे पोपट एक वचनीच आहे. पोपटाचे रान उडणे आणि पिंजऱ्याला मात्र कडी असणे याचा संबंध लागत नाही. पण देहातून प्राणरूपी पोपट उडून जातो म्हणजे मृत्यू संभवतो असे म्हणता येईल.

दगडाचा घोडा
त्याला अंधाराचे शिंग
शुभ्र हाडांनाही फुटे
कसे काळे अंग?

दगडाचा घोडा आहे. घोडा या प्राण्याला शिंगच नसते पण या कवितेतील घोडयाला अंधाराचे शिंग आहे आणि शुभ्र पांढऱ्या हाडांना काळे अंग फुटते म्हणजे काय होते? यातील कोणत्याही प्रतिमेचा अर्थबोध होत नाही.

## 'उखाणे'

चंद्रमाधवीचे प्रदेश या कवितासंग्रहातील 'उखाणे' याच शीर्षकाची कविता पृष्ठ ७९ वर आहे.

गरतीच्या बागेतून
पुनवेचा चांद दिसे
सवतीच्या पोरीला
चालताना गाव हसे.

बाभळीच्या बहराहून
काटयांचे रंग मऊ
रांडेच्या लग्नाला
चोरूनिया चल जाऊ !

असे आठ दुर्बोध उखाणे कवी या कवितेत घालतो. पुनवेचा चांद एका घरंदाज चारित्र्यसंपन्न स्त्रीच्या घराच्या बागेतून दिसतो. आणि सवतीच्या पोरीला चालताना बघून गाव कुत्सितपणे हसतो. यामागे कवीचा कोणता तरी भूतकाळातील अनुभव दडलेला आहे.

बाभळीची फुले पिवळीधमक अतिशय मृदु असतात. तिच्या फुलांच्या बहरापेक्षाही तिचे काटे मऊ आहेत हे सांगून कवी म्हणतो, रांडेच्या लग्नाला चोरून जाऊ. इथे बाभुळबन आणि लग्न यांचा काय, कसा संबंध येतो ते उमगत नाही. रांडेच्या लग्नाला जाण्यासाठी कवी कुणाला तरी सोबत येण्यासाठी बोलावतो आहे.

काही कवितांची रचना शब्दकोडयासारखी नाही. पण कवीने कवितेला 'उखाणा' हे शीर्षक दिले आहे. उदा. 'उखाणे' ही कविता. या कवितेतील स्त्री म्हणते -

पुढे मिटला काळोख
झाली देऊळ पापणी
आता हळूच टाकीन
मऊ सशाचा उखाणा

काही कविता अभंगाच्या ओवीच्या स्वरूपाच्या वाटल्या तरी उखाणा-सदृश्य वाटतात. उदा. आषाढबन, आकाश, डोळे इत्यादी.

## निसर्ग कविता

ग्रेस यांच्या निसर्गातून येणारा निसर्ग साठोत्तरी मराठी नवकवितेतून येणाऱ्या निसर्गापेक्षा वेगळा आहे. तसे पाहिले तर ग्रेस यांची कोणतीच कविता एकाच विषयाला धरून येत नाही. ग्रेस भावकवी आहेत आणि त्यांच्या भावनाविष्कारात निसर्गाची अतूट संगत आहे. सर्व अर्थच्छटा, भावछटा व्यक्त करताना निसर्गातील सर्व लहानमोठया गोष्टींचे, चराचरांचे संदर्भ येतात. पर्यावरणातील सर्वच घटक, सर्व काळास्थिती त्यांच्या कवितेत येतात. त्यामुळेच त्यांच्या निसर्गकवितांचे वर्णन करणे अवघड बनते. 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या दोन्ही काव्यसंग्रहात निसर्ग कविता संख्येने अधिक आहेत. त्यांच्या निसर्ग कविता पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### निसर्ग कविता

| | | | |
|---|---|---|---|
| पाऊस | संध्याकाळच्या कविता | | पृष्ठ २६ |
| श्रावण | " | " | " २७ |
| दुपारचे ऊन | " | " | " ३८ |
| दुपार | " | " | " ३९ |
| भूल | " | " | " ४५ |
| वाराणसी | " | " | " ४६ |
| शिलालेख | " | " | " ५० |
| रंगास्त | " | " | " ७० |
| सांज | " | " | " ७१ |
| बर्फाच्या कविता | " | " | " ७६,७७ |
| पाऊस | चंद्रमाधवीचे प्रदेश | | पृष्ठ ४ |
| माहेर | " | " | " १५ |
| डोंगर | " | " | " १८ |
| पाऊसगाणी | " | " | " २८ |
| चंद्र | " | " | " ३१ |
| बाग | " | " | " ५७ |
| काळोख | " | " | " ७५ |

| | | | |
|---|---|---|---|
| पावसाच्या सरी | चंद्रमाधवीचे प्रदेश | | पृष्ठ ७७ |
| संध्याकाळ | " | " | " ८६ |
| नभ | " | " | " ९७ |
| उदयास्त | " | " | " ९९ |
| अस्त | " | " | " १०० |
| पाणी १,२ | " | " | " १०६,१०७ |
| वर्षा | " | " | " १०९ |
| आकाश | " | " | " ११० |
| रान | " | " | " १११ |
| ऊन २ | " | " | " ११२ |
| टेकडया | " | " | " ११३ |
| निष्पर्ण तरूंची राई | " | " | " ११४ |
| सूर्यास्ताचे पाणी | " | " | " १२३ |
| संध्याकाळी | " | " | " १४६ |
| चंद्र | " | " | " १४९ |
| समुद्र | " | " | " १४९ |
| वारा | " | " | " १५३ |
| सूर्य | " | " | " १६३ |
| पाऊस | " | " | " १७१ |
| डोंगरदेऊळ | " | " | " १७८ |
| ऊन | " | " | " १७९ |
| दुसरा पाऊस | " | " | " १८० |
| सूर्यास्ताचे पाणी | " | " | " १८७ |

ग्रेस यांनी निसर्गाला आपल्या भावविश्वात जीवंत स्वरूपात प्रतिष्ठापित केले आहे. दिवसाच्या, काळाच्या सर्व अवस्था उदा.सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र,युग, क्षण त्यांच्या कवितेत येतात.

## दुपारचे ऊन.

मृगजळातील चित्रांचे आभास दाखविणारी ही कविता आहे. दुपारच्या अपार शून्यता असलेल्या विचित्र एकसंधतेत इंद्रियांचे अनंत शोक जागवणारी दुपार या कवितेत कवीला जाणवते. अतर्क्य तप्त सूर्याच्या उष्णतेमुळे समुद्र आटतील का? असे भय मनात येते आहे. अशा मनाच्या प्रदेशात अवेळी कोणीतरी फिरते आहे. ते कोणी तरी म्हणजे कवीची प्रिया आहे. कारण कवीलाच पिऊन टाकू शकणारी तहान लागली आहे आणि कंठ मात्र तिचा निळा होतो आहे असे कवी म्हणतो.

तहान ही मला गिळे नि कंठ हो तुझा निळा
उन्हात पाय वाजती कुणात जीव गुंतला....

इथे दुपारच्या वेळी कवीमनात जागृत झालेली कामभावना व्यक्त होताना दिसते. पण आवतीभोवती सर्वजण असूनसुध्दा कवीला दिशाहीन एकटेपण जाणवते आहे. इथे कवी प्रियतमेला प्रेमाचा जोगवा मागतो आहे.

## 'पाऊस'

'पाऊस' या कवितेत कालनिश्चिती नाही. पाऊस पडतोच आहे. केंव्हापासून पडतो आहे माहित नाही.

पाऊस कधीचा पडतो

झाडाची हलती पाने

हलकेच जाग मज आली

दुःखाच्या मंद सुराने

पाऊस पडतानाचे सृष्टीचे वर्णन आले आहे त्याचबरोबर कवीची मनोवस्था पण रेखाटली आहे. दुःखाच्या मंद सुराने कवीला जाग आली आहे. दुःखाने, अश्रूने भरलेले डोळे पावसाच्या पाण्यावर फिरत आहेत आणि दूर नितळ उतरणीवर रक्ताचा पारा उडला आहे. कवी दुःखी असल्याने निसर्गही दुःखीच आहे. सृष्टीला कवीने आपल्या भावविश्वात सामावून घेतले आहे.

ढगाळलेल्या आभाळाला वादळी वारा ढवळून काढतो आहे. तसे कवीच्या मनात भावनांचे वादळ चालू आहे. समुद्रावर पण वादळे आहेत. पाणी उसळतेय पण समुद्राला लाटांच्या मर्यादा आहेत. कवीच्या सुप्त मनात ही जी भावनिक वादळे घोंगावताहेत, जे भावनिक आवर्त उठतेय त्याला कवीचे प्रकट मन मर्यादा घालतेय.(या कवितेत समुद्राच्या किनाऱ्यालाच लाटांचा पहारा आहे असे कवी म्हणतो आहे. 'लाटांना किनाऱ्याचा पहारा असणे' ही संकल्पना वास्तव, उचित आहे. पण किनाऱ्याला लाटांचा पहारा असणे ही कवीची कल्पना लाटा आणि किनारा यांच्या भूमिका बदलून घेते आणि किनाऱ्यावरती लाटांचा पहारा आहे असे वर्णन करते.) ग्रेस यांच्या कवितेला मानसशास्त्रीय विश्लेषण अत्यावश्यक ठरते ते अशावेळी.

संदिग्ध घरांच्या ओळीमध्ये स्वतःचे अस्तित्व शोधताना पुन्हा त्याच्या मनाच्या खोल तळाशी एक प्रतिमा जन्म घेते. ती म्हणजे -

पेटून कशी उजळेना
ही शुभ्र फुलांची ज्वाला
ताऱ्यांच्या प्रहरापाशी
पाऊस असा कोसळला

कवीच्या भावभावनांशी सजीवपणे नाते सांगणारा निसर्ग आपणास या कवितेत दिसतो. ढगाळलेले आकाश, नितळ उतरण, कोसळणारा पाऊस, उसळणाऱ्या लाटा आणि लाटांचा पहारा हे सगळे शब्द पावसाळी दिवसाचे चित्र आणि पावसाळी निसर्गाचे चित्र रेखाटतात.

**'निळाई'.**

ग्रेस यांची निळ्या रंगाची उधळण करणारी ही कविता वाचकांना वेगळयाच निळाईत घेऊन जाते. ग्रेस यांच्या प्रतिभेने जी त्यांची स्वतःची अशी विश्वनिर्मिती केली आहे त्यात ही 'नीलनगरी' अस्तित्वात आहे.

या कवितेत सर्व सृष्टीच निळी आहे. निळया रंगाचे ढग, निळे ऊन, निळे घाटमाथे, निळी राऊळे, निळयाशार पाऊलवाटा, निळे धुके, निळा सूर्यनारायण, निळे वारे, निळा चंद्र, निळी पाखरे, निळे सूर, निळी गीतशाळा, निळे चांदणे, निळे चंदन असा निळया रंगाचा उत्सव कवितेत साजरा होतो.

कवी आपल्या साजणीला सांगतो आहे, साजणी मला निळे ऊन लागते आहे. आणि माझ्या निळयाच अश्रूंनी माझ्या पापण्या भिजल्या आहेत. निळयाशार मंदार वाटावरून पसरलेल्या निळया धुक्याची भूल पडली आहे आणि कवी मावळत्या निळया सूर्याला प्रार्थनांचे असंख्य अर्घ्य देत आहे.

निळया सूर्यास्तानंतर निळया संध्याकाळी निळया आकाशात निळा चंद्र डुलतो आणि संध्याकाळची निळी पाखरे आपल्या चोचीत निळे दुःख घेऊन येतात. त्या पाखरांची पाऊले निळी आहेत.

निळया रात्रीच्या वेळी निळया गीतशाळेतून निळे सूर झंकारत आहेत. त्या निळाईतच कवीच्या सखीची सखी आली निळया चांदण्याने, निळया चंदनाने कवीची प्रेमाची पालखी मात्र भिजली नाही.

कवितेच्या शेवटच्या चार ओळीतून शृंगारभावना व्यक्त होते. अंगसंगाची आसक्ती आणि अनुभव सूचित होतात. दोन प्रणयी जीवांच्या प्राणांचे ऊन प्राणात जाते आणि मिलनोत्सव झाला की निळी तोरणे सजतात.

या कवितेतील निळा निसर्ग हा कवीच्या स्वप्न नगरीतील निसर्ग आहे. ही स्वप्न नगरी निळया रंगाची आहे. ही कविताही संगीताचे आकर्षण धरणारी आणि गेय आहे. ग्रेस यांना निळा रंग प्रिय असावा. त्यांच्या इतर निसर्ग कवितेतूनही निळया रंगाचे वर्णन येते. उदा.अस्त, ऊनकावळा किमया, पाणीः१, ऊन :२, टेकडया इत्यादी.

## 'व्यक्तिपर' कविता

आयुष्यात भेटणाऱ्या अगणित व्यक्तींपैकी काही व्यक्ती मनात घर करून जातात. कवी-लेखक त्यांना शब्दबध्द करून अमर करून ठेवतात. थोर संत, समाजसुधारक, पौराणिक, ऐतिहासिक व्यक्ती, आदर्श स्त्री-पुरूष यांच्यावर कविता केल्या जातात. त्याचप्रमाणे व्यक्तिगत जीवनात आणि भावविश्वात आलेल्या व्यक्तींवरही कविता केल्या जातात. कवी ग्रेसही त्याला अपवाद नाहीत. त्यांच्या 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या दोन काव्यसंग्रहातील व्यक्तिपर कविता स्थूलमानाने पुढीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| इन्ग्रिड बर्गमन | संध्याकाळची कविता | | पृष्ठ ५८ |
| घोडे | " | " | " ६१ |
| उर्मिला | " | " | " ६५ |
| देखणा कबीर | " | " | " ६६ |
| आर्थोपिडिक्स | " | " | " ७२ |
| उर्मिला १,२,३ | " | " | " ७५ |
| माई | चंद्रमाधवीचे प्रदेश | | " २० |
| कै.ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी | " | " | " ११७ |
| मर्लिन मेन्रो | " | " | " १३० |
| इनोसंट एलिस | " | " | " १३१ |
| दौलतराव गोळे | " | " | " १३२ |
| आरती प्रभू | " | " | " १३३ |
| द्रौपदी | " | " | " १५८ |

ग्रेस यांची व्यक्तिपर कविता वाचल्या की त्यातील वैविध्यता लक्षात येते. संत, अभिनेत्री, कवी, लेखक, समाजसुधारक, शेजारी, गायिका, आई,मुलगी, प्रेयसी,

पौराणिक स्त्री-पुरूष, छोटी मुलगी, हॉस्पिटलमधील वास्तव्यात भेटलेल्या व्यक्ती अशा अनेकविध व्यक्ती ग्रेस यांच्या काव्याचा आणि ललितनिबंधाचा विषय बनलेल्या आहेत.

## 'इन्ग्रिड बर्गमन'

त्यांची ही कविता विशेष ठरावी कारण या नटीच्या दर्शनानेच त्यांना त्याच्या प्रतिभारूपाचा प्रथम साक्षात्कार झाला. इंग्रजी चित्रपटातील (इन ऑफ दी सिक्स हॅपिनेस) तिची भावमुद्रापाहून त्यांना वाटले की तिने हलकेच शीळ घातली आहे. त्यांच्या आत्म्यावरची धूळ उडते आहे. हीच अनुभूती 'इन्ग्रिड बर्गमन' या कवितेत आली आहे.

इन्ग्रिड बर्गमनचे आषाढातील भर्जरी मेघासारखे ऐहिक डोळे ग्रेस यांच्या प्रतिभाविश्वाला उजळवून गेले आहेत आणि साता समुद्रापार असलेली इन्ग्रिड बर्गमन त्यांच्या जीवनात वास्तव्य करून राहिली आहे. तिच्याशी त्यांचे भावनिक नाते जडले आहे. त्यांच्या देहवासना, मनोसंवेदना या बर्गमनच्या अस्तित्वाशीच बांधल्या आहेत. तिने चित्रपटात ज्या भूमिका केल्या त्यांचे संदर्भ ग्रेस वास्तवजीवनाशी जोडतात. म्हणूनच 'अ वीक इन् द स्प्रिंग रेन' या चित्रपटात बर्गमनने 'संताला आलिंगन देतानाचे दृश्य, वास्तव जीवनात घडले आहे अशाच रीतीने ग्रेस काव्यबध्द करतात.

आषाढातील भर्जरी मेघासारखे पूर्ण ऐहिक डोळे
घेऊन आलीस; नेस्तनाबूत झालेल्या या
साथीच्या गावात.

या ओळी ग्रेसच्या भावविश्वातील स्वप्नभासाच्या प्रदेशातील बर्गमनच्या भर्जरी आगमनाचे वर्णन करतात.

तुझा घोडा तू मोकळा सोडलास
शिशिराच्या निर्विघ्न कुरणात
तो मधेच दिपून पाहतो, एका नसलेल्या ध्रुवाच्या
दिशेत झिजणाऱ्या तुझ्या देहास.

या ओळीतून दिपून पाहणारा घोडा हे कवीच्या मनातील कामवासनेच्या उर्मी सूचित करतो. पण त्यानंतर कवीचे मन लगेच दुःखाने भरून जाते. अज्ञात प्रदेशातून बर्गमनच्या मृत्यूच्या घंटानिनादाची महापर्वणी सुरू होते आणि कवीच्या भासजगताच्या काठाला बर्गमनचे

निःशब्द निर्गमन कवीला व्याकुळ करते आणि त्याच्या नजरेसमोर 'अ वीक इन द स्प्रिंग रेन' या चित्रपटात बर्गमनने संताला दिलेले आलिंगन सचित्र होते.

स्वतः ग्रेस इन्ग्रिड बर्गमनला व्यक्तिशः कधीही भेटले नाहीत तरीही तिचे त्यांच्या जीवनातील अस्तित्व वाचकांना सत्यवत वाटते. हीच ग्रेस यांच्या कवितेची किमया आहे.

इन्ग्रिड बर्गमनचाच उल्लेख 'घोडे' या कवितेत येतो पण त्याबरोबरच अॅना फ्रँक आणि तिच्या डायरीतील अक्षरांचा उल्लेख येतो. इन्ग्रिड बर्गमन आणि 'घोडा' ही प्रतिमा यांचा परस्परसंबंध ग्रेस यांच्या मनाच्या गूढ गाभाऱ्यात निश्चितच आहे.

## 'ऊर्मिला'

ऊर्मिला आणि ऊर्मिलेच्या कविता : १,२ या तीन कविता 'ऊर्मिला' या स्त्रीविषयी आहेत. ग्रेस यांच्या 'ऊर्मिलेची लक्ष्मणरेघ' या 'मितवा' मधील ललितनिबंधामध्ये ही ऊर्मिला भेटते. या ऊर्मिलेचे ग्रेस यांच्या जीवनातील स्थान भावनिक पातळीवर बरेच उंचावर असावे. सायंकाळच्या कातरवेळी कवीला ऊर्मिलेच्या आणि तिच्या घडलेल्या अंगसंगाच्या आठवणी दाटून येत आहेत. ऊर्मिलेसंबंधीच्या तीनही कवितातून ऊर्मिलेच्या प्रती कवीला वाटणारी प्रणयभावना प्रकर्षाने जाणवते. पण ही प्रणयभावना 'दुःखात अंबरे झुलती' अशा शब्दात वर्णन केली आहे. ग्रेस हे प्रेमाची भावना दुःखाच्या मापाने मोजतात. असे त्र्यं.वि.सरदेशमुख म्हणतात, ते ग्रेस यांच्या सर्वच कविताप्रमाणे याही कवितेत प्रत्ययाला येते. ऊर्मिलेचे मुक्त केस, अंग झाकणाच्या लज्जेने केलेले नग्नतेचे सूचन, प्रणय भावनेचे मनात नाचणारे मोर आणि कवीने ऊर्मिलेला 'डोळयात बांधला राघू' सोडण्याची घातलेली मादक साद हे सरळ, स्पष्ट, उत्कट चित्र संध्याकाळच्या पार्श्वभूमीवर वाचकांनाही आकर्षित करते. दूरवरची पसरत जाणारी क्षितिजे, हळूहळू अवतरणारी संध्या आणि पाण्यात थांबलेल्या नावा ही निसर्गाची साथ सोबत या प्रणयभावनेचा अविभाज्य भाग बनून जाते.

तू सोड ऊर्मिले आता
डोळयात बांधला राघू....

या ओळीतून ऊर्मिलेला केलेले हळुवार प्रणयासाठीचे आवाहन कमालीचे लडिवाळ झाले आहे. त्यातून मिलनाची उत्कट आतुरता व्यक्त झाली आहे.

ऊ र्मिलेशी गतकाळात झालेले प्रणयव्यवहारही यावेळी कवीला सुखद आठव देत आहेत. तिच्या देहाचे स्पर्श त्याला आठवतात. 'धुके दाटलेले दग्ध पुरातन शहर' म्हणजे उर्मिलेशी गतकाळात झालेला अंगसंग होय. त्या सुखाचे वर्णन ग्रेस यांनी 'सुख असे कळीतुन फिरते' असे केले आहे. पण या सुखाच्या क्षणीही दुःख जाणीव नष्ट झालेली नाही. कारण संध्याकाळच्या वृक्षछायानी आभाळ व्यापून गेलेय पण कवीला या छाया खडकाळ वाटताहेत. सुखाबरोबर दुःखाची भावना आणि त्यात मिसळलेली प्रणयभावना अशी तिहेरी वीण या कवितेत झाली आहे.

या बरोबरच कवी इतर अनेक व्यक्तींना काव्यबध्द करताना दिसतो. आरती प्रभू यांना ग्रेस 'आरती प्रभू' या कवितेत 'सखा' म्हणून संबोधतात त्यांचा मृत्यू ग्रेस यांना पोरका वाटतो. त्या पोरकेपणाला त्यांनी सुंदर उपमा दिली आहे. 'सतीच्या खुनासारखा पोरका' सती गेल्यावर त्या स्त्रीच्या मृत्यूला जबाबदार कुणाला धरायचे? तद्वतच आरती प्रभू स्वतः मृत्यूला सामोरे गेलेत.

आरतीप्रभूंच्या प्रतिमेशी ग्रेस आपल्या प्रतिभेचे नाते सांगताहेत म्हणूनच दुपारच्या समुद्रावरील वाळूत कवीने आरती प्रभूंना ओवाळले आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची प्रतिभा विधवा झाली आणि ती कवी ग्रेस यांच्या दारात आली.

एका प्रतिभावंताने दुसऱ्या प्रतिभावंतावर आशयघन कविता करणे हाच एक वाङ्मयीन सुखद अनुभव आहे.

ग्रेस यांनी कविताच नव्हे तर आपल्या ललितनिबंधाचे विषयही कवी, लेखक असे निवडले आहेत. उदा.कुसुमाग्रज है तेरा दोस्त मगर.... दुसऱ्या देवीचा शोध इ. 'दुसऱ्या देवीचा शोध' हा निबंध जी.एं.शी संबंधित आहे. जी.एं.कुलकर्णी आणि ग्रेस यांची मैत्री आणि त्यांचा पत्रव्यवहार हा एक वेगळा अभ्यासाचा विषय होईल.

## दुर्बोध कविता

ग्रेस यांच्या 'दुर्बोध' कवितांचा वेगळा गट करताना अडचण होते. कारण त्यांच्या काही कवितांचा अपवाद वगळता, त्यांच्या प्रत्येक कवितेत दुर्बोधतेची ठेच लागतेच. पण तरीही काही कविता इतक्या दुर्बोध आहेत की, त्यातील शब्दांचे वाच्यार्थच लावता येतात. इतर कोणत्याही शब्दशक्तीने त्या कवितातील अर्थाशयाचे अनुभूतीचे आकलन होत नाही. या कविता विचारांच्या, तर्कांच्या, संवेदनांच्या कोणत्याच चौकटीत बसत नाहीत. भावनांची व्यामिश्रता, जटिलता, अनुभूतीतील अद्‌भूतता ही मनोविश्लेषणात्मक सिध्दांतांनी उकलता येण्याची शक्यता असते. पण अतार्किक अनुभव आणि काल्पनिक विश्वातील अद्‌भुत नवलाई जेव्हा बुध्दिसामर्थ्याने जाणून घेता येत नाही तेव्हा ती दुर्बोधता नकोशी वाटते. त्याज्य वाटते. अशाच काही कविता ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहातून आढळतात. त्या पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| पांढरे हत्ती | संध्याकाळच्या कविता | पृष्ठ २० |
| लाटांचे देऊळ | " " | " २३ |
| स्वप्न | " " | " ५३ |
| प्रिस्टस् | " " | " ७४ |
| मीठ | चंद्रमाधवीचे प्रदेश | " २३ |
| जाऊबाई | " " | " ३० |
| काळा घोडेस्वार | " " | " ५१ |
| दूध | " " | " ६९ |
| ऊन कावळा | " " | " १०१ |
| पाणी :२ | " " | " १०७ |
| कै.ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी | " " | " ११७ |
| चंद्रमाधवीच्या तीन कविता : २ | " " | " ११९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चित्रबंदिनी | " | " | " | १४० |
| सावली | " | " | " | १६४ |
| घोडा | " | " | " | १८४ |
| धर्मांतराच्या प्रार्थना | " | " | " | १९५ |


## 'पांढरे हत्ती'

'पांढरे हत्ती' ही ग्रेस यांची 'दुर्बोध' म्हणून गाजलेल्या अनेक कवितांपैकी एक कविता. संपूर्ण कविता निसर्गरम्य दृश्यांनी, अद्‌भूततेने आणि नवीन प्रतिमांनी एक कमालीचा जटिल, व्यामिश्र अनुभव शब्दबध्द करते.

रानातून पांढऱ्या हत्तींचा कळप निघाला आहे. तो गर्द शोकाच्या झाडांमध्ये मिसळून गेला आहे. ही वेळ संध्याकाळची आहे. या कातरवेळी मशीदी गूढ वाटताहेत. मशीदींवर पक्षी किलबिलाटाचा कल्लोळ करताहेत. त्या पक्ष्यांच्या मोठया थव्याखाली गूढ मशीदी बुडून गेल्या आहेत. झाडांच्या गर्दीत शिरलेल्या हत्तींनी मग दूरवरचे डोंगर उचलून धरले त्याचवेळी काळजाखालील अस्थिंचे झुंबर फुटले. आता मावळतीला रंगाची पिसाट उधळण चालली आहे आणि भयभीत झालेली हरणे उधळली आहेत. अशा संध्यासमयी दुःखव्याकुळ अश्रुपूर्ण चेहरा कवीला दिसतो आहे. संध्याकाळची उतरती उदास किरणे अश्रूत उतरली आहेत. पांढरे शुभ्र हत्ती मग अंधारबनातून गेले आणि त्या बनात ते जिथे थांबले होते ते वृक्ष पांढरे झाले.

या कवितेत निसर्गचित्र आले आहे. तेवढा आकलन होणारा भाग सोडला तर या कवितेतील काव्यानुभवाचा जराही बोध होत नाही. या कवितेची निर्मितीच कवीच्या काल्पनिक विश्वातील नवलपूर्ण घटनातून झाली आहे. अद्‌भूततेमुळे नेमका, एक तर्कबध्द, विधानात्मक, बुध्दीगम्य अनुभव ही कविता देत नाही. कवितेतील अंधारबन आणि पांढरे हत्ती कवीला भासाच्या पातळीवर दिसले आणि त्याच भासमय चित्राची कवीने कविता केली.

## 'प्रिस्टस्'.

'प्रिस्टस्' ही ग्रेस यांची अशीच दुर्बोध कविता. ही कविता कोणास उद्देशून आहे हे स्पष्टपणे सांगितले नाही पण ती 'प्रिस्टस्' चा विषय असल्याने परमेश्वरास उद्देशून

असावी म्हणूनच,

> तुझ्या पायातून खेडींच्या खेडीं ओस पडावी
> तसे हे प्रिस्टस्
> एका संध्याकाळी बाहेर जमले पठारावर
> मोकळया आकाशात एखादा तारा उगवेल
> म्हणून पाहण्यासाठी,

असे कवी म्हणतो.

पण तारे पाहण्यासाठी पठारावर जमलेल्या प्रिस्टस्च्या डोळयांना खाचा नाहीत आणि डोळयात पाण्याचे अज्ञात तळही नाहीत. पण वेळी अवेळी या प्रिस्टस्च्या शरीराच्या छिद्रातून ख्रिस्तव्याकुळ घटांचे नाद आरपार शिरतात आणि मग ते चपापून महाशून्यात चौफेर पाहू लागतात. ते महाशून्यात काय पाहतात ?.... तर देवाने घडविलेले एखादे हृदय, कर्माने बांधलेले एखादे घर नाहीतर रक्तमांसाच्या संभोगाला उगवलेले शिल्पउदास व्याकुळतेचे एखादे फूल.

गद्यसदृश्य असणारी ही कविता नेमके काय सांगते ते कळत नाही. ईश्वराच्या पायातून ओस पडणारी खेडी म्हणजे प्रिस्टस् असे कवीला का वाटते? त्यांच्या डोळयांना खाचा नसूनही पठारावर जमून ते आकाशातला उगवणारा तारा कसा पाहू शकतील? आणि महाशून्यात ते एखादे हृदय, एखादे कर्माने बांधलेले घर नाहीतर संभोगाला उगवणारे व्याकुळतेचे फूल शोधतात म्हणजे नेमके काय करतात? रक्तमांसाच्या संभोगाचे फूल म्हणजे नवजात बालक म्हटले तरी ते शिल्पउदास व्याकुळतेचे फूल असे कवी कोणत्या अर्थाने म्हणतो? या अशा प्रश्नांना कवितेतून कोणतेच उत्तर मिळत नाही. नेमका कोणता आशय, कोणता अनुभव, कोणता विचार कवीला अभिव्यक्त करावयाचा आहे याविषयी वाचकाला कसलाच बोध होत नाही.

### 'पाणी : २'

पाणी :२ ही 'चंद्रमाधवीचे प्रदेश' मधील कविता असून तिच्यात अनेक तुटक तुटक अनुभवांची आणि दृश्यांची मालिका आहे. या दृश्यांनी कोणतेही एक सलग चित्र तयार होत नाही. एकसंध अनुभव प्रत्ययाला येत नाही.

या कवितेतील 'ती' काही झाडे, काही शिवालये आणि काही शिशिर घेऊन आयुष्यभर हिंडली. तिच्या नक्षीवंत देहामधे काही उगवावू प्रेरणा तिला दिसून आल्या. (हे वर्णन ग्रेस यांच्या 'आई' या संकल्पनेला तंतोतंत लागू पडते.) त्या प्रेरणा म्हणजे रक्ताच्या वेली, श्वासांचे झरे आणि दोन्ही डोळयांच्या खाचातील बाहुल्याचे प्रच्छन्न पहारे होत्या.

तिने पियानो आणि पाणी यांचे चिंतन केले आणि तिच्या डोळयादेखत मेघमाला तुटून पहाडांवर पाऊस साठला आणि ती तळव्याच्या ओलाव्यातील दोन कमळे पाहत राहिली.

मातीच्या वैष्णवी विस्तारातील यात्रेत ती परत आली. निखळलेला नुपूर तिने गिळला आणि भूमिकन्या होऊन ती नाचू लागली. देवाच्या आकाशाचा मागोवा तिच्या समोरून गेला. त्याबरोबर ती निष्णात लगबगीने आपल्या देहाच्या यक्षवनात अदृश्य झाली.

आता चंद्रास्तामधली सगळी उद्ध्वस्त नगरे तिने आपल्या स्तनयुग्मातील भयाण तमागारात झाकून ठेवली आहेत आणि आपल्या कपाळावर पसरलेली आकाशाची धूळ तिने पुसून टाकली. थोडेसे थांबून, तिने हलक्या हाताने आपले डोळे खुडून घेतले. तेव्हा चंद्र नव्हता फक्त रानफुलांवर थोडेसे पाणी थरथरत होते.

या कवितेतील 'ती' म्हणजे कोण? अशी झाडे, शिवालये आणि शिशिर ऋतु घेऊन ती आयुष्यभर का हिंडली? आणि प्रेरणा दिसल्यावर तिने पियानो आणि पाण्याचे चिंतन केले म्हणजे नेमके काय केले? तळव्याच्या ओलाव्यातील दोन कमळे कशास उद्देशून म्हटले आहे? मातीचा वैष्णवी विस्तार म्हणजे काय? निखळलेला घुंगरू तिने गिळला म्हणजे काय केले? या आणि अशा अनेक प्रश्नांच्या जंगलात ही कविता वाचकांना घेऊन जाते. कोणतीही सुसंगती या कवितेतून जाणवत नाही.

### 'कै.ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी'

ग्रेस यांची ही अत्यंत जटिल आणि दुर्बोध कविता वाटते. या कवितेतील संत ज्ञानेश्वर, टॉलस्टॉय, ॲना, मर्लिन मेन्रो, डी गॉल, सार्त्र, कुप्रिनच्या मानसकन्या, म्हाइंभट्ट या सर्व देशी-विदेशी, वास्तव व काल्पनिक व्यक्ती आपणास परिचित असतात.

तरीही ही कविता 'असंबध्द'वाटते. कारण कवीची अनुभूती नेमकी कोणत्या विषयाशी, कशा संदर्भात आहे हेच उमजत नाही.

या कवितेत प्रारंभी कवी शब्दांवरचे प्रेम व्यक्त करतो आणि ज्ञानेश्वरांची कुंडली मांडतो. ज्ञानेश्वरांच्या शब्दशक्तीबद्दलचा आदर व्यक्त करतो. पण लगेल कवीला स्वतःच्या भाग्यरंध्रावरचे मावळतीचे ऊन आठवते. आणि कार्तिकातला धुके भरलेला वारा त्याच्यासमोर त्याचा निर्वेदी आयुष्याचा भविष्यकाळ घेऊ न येतो. इथे पुन्हा ज्ञानेश्वरांना त्यांच्या संपूर्ण नावासह संबोधित करून कवी उरापोटात तटतटून आलेल्या भगवती आकाशाचा उल्लेख करतो. तंद्रीच्या चंद्रकिनारी शिष्यशिष्यिणींचे आभास चांदण्याखाली कवी विसरून जातो. कवीचे हात जखमी, रक्तबंबाळ झालेले आहेत आणि ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या विश्वतन्मयी पसायदानाने कवी व्याकुळ होतो. आणि स्वतःलाच आदळून टाकतो. पुन्हा एकदा ज्ञानेश्वरांना संपूर्ण नावाने पुकारून कवी त्यांना म्हणतो, शरीराला ओढणाऱ्या सायंकाळी तिन्ही भावंडे निघाली असतील. यानंतर कवीला टॉलस्टॉयची ॲना, त्याच्या डोळयासमोरून मास्कोच्या स्टेशनकडे निघालेली दिसते. मरलिन मेन्रोची आत्महत्या ही कवीला तिच्या वक्षःस्थळाची आत्महत्या वाटते आणि डी गॉलने सार्त्रला लिहिलेल्या पत्रातील निर्भत्सनामय अक्षर कवीला दिसते. म्हाइंभटाची आठवण कवीला येते आहे. हा सगळा आठवणींचा प्रवास आहे असे क्षणभर वाटते पण या आठवणी नसून या 'संभोगाच्या विश्वतऱ्हा' आहेत असे कवी कै.ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी यांना सांगतो आहे. कवी आता थोडे थांबतो अंगावरचे स्वेदब्रह्म पुसतो आणि निर्जन गुहेतील वेडा आणि ही भेदरलेली मुले पाहून दचकतो. स्वतःच्या देहाच्या उकीरडयावर कवी स्वतःचेच प्रेत खुशाल उभे करतो आणि त्याच्या कोवळया बुबुळांना चोचींनी फोडण्यासाठी सर्व कावळे मायेने धावत येतात.

२९ ओळींच्या या गद्यसदृश कवितेत इंग्रजी शब्द इंग्रजी लिपीतच लिहिले आहेत. या कवितेतून अर्थसंघटन जाणवत नाही. कवी प्रतिभेच्या पातळीवर जगत असताना चंद्रमाधवीच्या प्रदेशातील संध्याकाळच्या मावळत्या उन्हात कवीला झालेले स्वप्नवत भास कवी शब्दबध्द करत आहे असे वाटते. अर्थात् ज्ञानेश्वर, टॉलस्टॉय, मर्लिन मेन्रो, म्हाइंभट इ. सृजनशील कलावंताची निर्मिती म्हणजे 'संभोगाच्या विश्वतऱ्हा' असे ग्रेस यांना वाटते.

कारण निर्मिती > मृत्यू > संभोग

संभोग > मृत्यू > निर्मिती

अशी त्रिवेणी ते मांडतात. म्हणूनच वरील सर्व कलावंताची निर्मिती आणि त्यांचा मृत्यू या गोष्टींना कवी 'संभोगाच्या विश्वतऱ्हा' म्हणतो. तरीही औचित्य, तर्कसंगती, विषयसंगती, विचारसंगती यांचा पूर्ण अभाव जाणवतो. अर्थात् ज्ञानेश्वरीतील विश्वरूप दर्शन, विश्वात्मक देवाला मागितलेले पसायदान यामुळे कवीला सर्वाठायी ज्ञानेश्वर दिसत असावेत असेही आपणास या कवितेसंदर्भात म्हणता येईल. तरीही कविता बव्हंशी दुर्बोधच राहते.

**सारांश -** प्रबंधिकेच्या या प्रकरणात आपण ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या दोन काव्यसंग्रहांचा परिचय करून घेतला. 'संध्याकाळच्या कविता' हा ग्रेस यांचा पहिलाच काव्यसंग्रह १९६७ साली प्रकाशित झाला असला तरीही त्यातील नवीनता, उत्कटता, तरलता आणि शब्दसौंदर्य याची मराठी काव्यक्षेत्राला दखल घ्यावीच लागली. संध्याकाळच्या कवितातून व्यक्त झालेले गहिरे दुःख आणि नवी शब्दकळा यांनी रसिकांची आणि समीक्षकांचीही दाद घेतली आणि ग्रेस यांचा मराठी काव्यक्षेत्रात लक्षणीय प्रवेश व परिचय झाला.

१९७४ साली प्रकाशित झालेल्या 'राजपुत्र आणि डार्लिंग' या कवितासंग्रहातही ग्रेस यांनी आपले वेगळेपण जपले, या कविताही रसिकांनी आनंदाने स्वीकारल्या. ग्रेस यांच्या कवितांचा शोध फ्रॉईड, युंग आदी मानसशास्त्रज्ञांनी मांडलेल्या मनोविश्लेषणात्मक सिध्दांतांच्या आधारेच घेतला पाहिजे ही गोष्ट समीक्षकांच्या आणि रसिकांच्या ध्यानात आली.

१९७७ साली प्रकाशित झालेल्या 'चंद्रमाधवीचे प्रदेश या काव्यसंग्रहात कवी ग्रेस अधिक मनमोकळे झालेले दिसतात. या कवितातील दुःखजाणीव अधिक तीव्र व गहिरी झालेली दिसते. 'चंद्रमाधवीचे प्रदेश' हाच ग्रेस यांच्या सृजनशक्तीचा प्रदेश आहे. या प्रदेशात सुगंधी मोगऱ्याचे विनाश आहेत; पेटूनही न उजळणारी शुभ्र फुलांची ज्वाला आहे. तर घरटे सोडून जाणारी 'निष्कासिनी' ही आहे. या प्रदेशात दुःख भरात येते, फुलत येते आणि दुःखाची भर्जरी तिरीप डोळयावर आली की कवी एखादा उखाणा घालताना आपणास दिसतो.

या दोन्ही काव्यसंग्रहातून आपणास असे दिसून येते की, ग्रेस यांची कविता दुर्बोध आहे. कवितेत असणारी ही दुर्बोधता म्हणजे काय? तिचा मराठी कवितेत प्रवेश कधी झाला आणि त्या दुर्बोधतेची कारणे कोणती याचा विचार आपण या पुढील ४ थ्या प्रकरणात करणार आहोत.

## संदर्भसूची


१) वा.रा.कांत : 'सत्यकथा' सप्टे.१९६८

२) त्र्यं.वि.सरदेशमुख : 'धुके आणि शिल्प' पृष्ठ १२५-१२६.


****